# बृहन्मुंबई महानगरपालिका

उद्यान खाते

**केंद्रशासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम -२००५**

**अंतर्गत**

**पोटकलम ४(१)(बी) अन्वये**

**उद्यान खात्याची माहिती**

**माहिती पुस्तिका -१**

***संस्था, संस्थेची कार्ये व कर्तव्ये यांचा तपशिल***

## माहिती पुस्तिका - १

# उद्यान खाते

### उद्यान खात्याची उद्दिष्टे

- मोकळ्या जागा सुरक्षित ठेवणे.
- अनधिकृत वृक्षतोडीस आळा घालणे.
- वृक्षांचे संरक्षण व जतन करणे.

### उद्यान खात्याची कार्ये व कर्तव्ये

**उद्याने:-**

१. मुंबईतील नागरिकांना सुविधेसह मोकळ्या जागा उपलब्ध करुन देणे.

२. मुंबईतील नागरिकांना पुरेशा मनोरंजनपर सुविधा पुरविणे.

३. विभागातील वृक्ष व वनस्पतींचे जतन करणे.

४. उद्याने, मनोरंजन मैदाने, खेळाची मैदाने विकसित करणे.

५. उद्याने, मनोरंजन मैदाने, खेळाची मैदाने यांचे परिरक्षण करणे.

६. प्रचलित धोरणानुसार मैदानांवर विविध कार्यक्रमांना परवानगी देणे.

७. उद्याने, मनोरंजन मैदाने, खेळाची मैदाने इ. यांची नियमितपणे पाहणी करुन अहवाल सादर करणे.

८. उद्याने, मनोरंजन मैदाने, खेळाची मैदाने इ. बाबत नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करणे.

९. उद्यानांचा विकास व परिरक्षण कामाचे पर्यवेक्षण करणे.

१०.ज्येष्ठ नागरिक व अपंगाकरिता रॅम्प-रेलिंग इ. सुविधा उपलब्ध करुन देणे.

**वृक्ष प्राधिकरण:-**

१. नविन वृक्षांची लागवड करणे.

२. रस्त्याकडेची व महापालिकेच्या आवारातील मृत व धोकादायक झाडे कापणे/ फांद्या छाटणे.

३. वृक्षांच्या योग्य व समतोल वाढीसाठी तसेच वाहतुकीस अडथळा ठरु नये म्हणून वृक्षांच्या फांद्या छाटणे.

४. अनधिकृत वृक्षतोडी विरोधात कारवाई करणे.

५. खाजगी, निमशासकीय व शासकीय आवारातील वृक्षांची कापणी / छाटणीबाबत अहवाल सक्षम प्राधिकाऱ्यास सादर करणे.

६. रोपवाटीकांचे परिरक्षण करणे.

७. उद्याने व वृक्ष याबाबत नागरिकांमध्ये जागरुकता व आवड निर्माण व्हावी याकरिता दरवर्षी पुष्पप्रदर्शन आयोजित करणे.

८. प्राप्त झालेल्या तक्रारींनुसार सार्वजनिक व खाजगी आवारातील वृक्षांचे सर्वेक्षण करणे.

९. रस्त्याकडेच्या वृक्षांची छाटणी करणे.

१०. दिलेल्या परवानगीनुसार होणाऱ्या वृक्ष कापणी / छाटणी कामाचे पर्यवेक्षण करणे.

११. वृक्ष लागवडीकरिता तांत्रिक सहाय्य पुरविणे.

१२. वाटपाकरिता व विक्रीकरिता वृक्ष / रोपे तयार करणे.

१३. सार्वजनिक प्रकल्प / खाजगी विकासांमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या वृक्षांचा अहवाल वृक्ष प्राधिकरणास सादर करणे.

१४. पावसाळ्यात घ्यावयाच्या खबरदारीबाबत नागरिकांना आवाहन करणे.

## उद्यान खात्यामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवा

१. प्रचलित धोरणानुसार मैदानांवर विविध कार्यक्रमांना परवानगी देणे.

२. प्राप्त झालेल्या तक्रारींनुसार सार्वजनिक व खाजगी आवारातील वृक्षांचे सर्वेक्षण करणे.

३. रस्त्याकडेची व महापालिकेच्या आवारातील मृत व धोकादायक झाडे कापणे/ फांद्या छाटणे.

४. वृक्षांची छाटणी करणे.

५. रोपांची विक्री

६. वृक्ष लागवडीकरिता मार्गदर्शन किंवा तांत्रिक सहाय्य पुरविणे

## महत्त्वाची साध्य केलेली कामे

- जी.पी.एस. तंत्रज्ञानाद्वारे वृक्ष गणना
- मियावाकी पध्दतीने शहरी वनीकरण

## मनोरंजनपर सुविधा

- पर्यावरणाच्या दृष्टीने अधिकाधिक जागृती निर्माण करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका व वृक्षप्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी उद्यान विद्या विषयक प्रदर्शन नि कार्यशाळेचे आयोजन तसेच विविध रोपांची विक्री करण्यात येते.
- मुंबईतील नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी विविध उद्यानांमध्ये उद्यान खात्यामार्फत सामाजिक संस्थांच्या सहकार्याने 'ग्रीन रागा - हिरवळीच्या सानिध्यात संगीतमय सकाळ' हा कार्यक्रम आयोजित केला जातो.

# उद्यान खात्याचा संरचनात्मक तक्ता




| ★ संक्षिप्तरुपे★ | | |
|---|---|---|
| 1 | स.उ.अ. | सहाय्यक उद्यान अधिक्षक |
| 2 | क.वृ.अ. | कनिष्ठ वृक्ष अधिकारी |
| 3 | उ.वि.स. | उद्यान विद्या सहाय्यक |

**► उद्यान पायाभूत कक्ष हा उद्यान खात्याअंतर्गत कार्यरत स्वतंत्र कक्ष आहे.**

